किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● इतिहास

५● थोडासा ‘रो(रु)मानी’ हो जाए...

९● महाजालाच्या चिनी मैदानात

१७● इतिहास आणि वस्तुनिष्ठता

२९● पुस्तकातून..(शिक्षणापेक्षा शीलाला अधिक महत्त्व द्या..)

३१● जिकडेतिकडे
(चिंपांझींचे जीवन ते वनांचे रक्षण )


**खंड १२ : अंक ३ जून २०१३**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**‘अर्थबोधपत्रिका’** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website-http://www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १२ (अंक ३) जून २०१३**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **‘अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# इतिहास

'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक वाचकांच्या हाती पडेल तेव्हा मृग नक्षत्राच्या सरी कुठे कोसळल्या असतील तर कुठे मृगाची प्रतीक्षा केली जात असेल. तसेच, उन्हाळ्याची सुटी संपवून नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याची सर्व जण वाट बघत असतील. शाळेची आठवण येताच काही आवडीचे विषय आणि काही नावडीचे विषय सहजच डोळ्यांपुढे येतात. शालेय जीवन म्हणजे काही मूलभूत व अनिवार्य विषय शिकण्याचाही काळ होय. शालेय जीवनात आपण सर्वच 'इतिहास' हा विषय शिकलो असलो तरी मोठे झाल्यावर त्याचे महत्त्व अधिक वाटत असावे! 'इतिहास विसरणा-यांना इतिहास लिहिता येत नाही, इतिहासातून धडे घेऊ न वर्तमानात कृती करायची असते', अशी वाक्ये निबंधात वा वक्तृत्वस्पर्धेत मात्र आपण लिहिलेली/म्हटलेली असतात. इतिहासाचा अधिक सखोल अभ्यास का करायचा तर पूर्वी कोणत्या घटना कोणत्या परिस्थितीत घडल्या, काही व्यक्तींनी वा मानवसमूहांनी कोणत्या परिस्थितीत कोणते निर्णय घेतले; त्या सर्व घटनांचा, निर्णयांचा काय परिणाम झाला... यासारख्या विविध बाबी समजून घेण्यासाठी. इतिहास आणि इतिहास-लेखनाच्या प्रांगणात डोकावण्याचा प्रयत्न पुढील पानांत केलेला आहे. उत्क्रांतीच्या काळातील घडामोडींपासून इतिहासाची सुरुवात होते. माकडांच्या काही प्रजातींपासून माणूस तयार झाला, असे उत्क्रांतीवादाचा जनक असलेल्या डार्विनने म्हणून ठेवले आहे. माणसांच्या वर्तनाची पाळेमुळे शोधण्यासाठी चिंपांझींचा अभ्यास विशेषेकरून केला जातो. माकडे आणि माणसे यांची बहुतांश जनुकेही एकसारखी आहेत. त्यामुळे माकडांचे वर्तन हा आजही अभ्यासाचा विषय बनलेला आहे. १९६०च्या दशकापासून या अभ्यासात रमलेल्या एका संशोधक स्त्रीची कहाणी ही रंजक आणि उद्‌बोधक आहे. स्थलांतर हाही माकडांच्या आणि माणसांच्या जीवनाचा अविभाज्य भाग राहिलेला आहे. उत्क्रांतीच्या काळापासून स्थलांतर घडत आलेले आहे ते आजपर्यंत. उदरनिर्वाहासाठी, शिक्षणासाठी, नोकरी करण्यासाठी अशा अनेक कारणांसाठी माणसे स्थलांतर करीत असतात.



स्थलांतरित मानवसमूहांचा अभ्यास हाही इतिहासाचा एक भाग ठरतो. स्थलांतरित जिप्सींचा म्हणजे रोमानींचा अभ्यास हा त्यांच्या कल्याणासाठी कोणती धोरणे गरजेची आहेत ते ठरविण्यास पूरक ठरतो. तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७५ वर्षांपूर्वी मांडलेले विचार हे आजही किती प्रस्तुत ठरतात ते १९३८ सालातील त्यांच्या एका भाषणाद्वारे दिसून येते. गतकालीन तथ्यांची नोंदणी इतिहास करत असतो. त्यामुळे इतिहास आणि वस्तुनिष्ठता यांचा परस्परसंबंध समजून घेणे अनिवार्य ठरते. साम्यवादी चीनचा इतिहास हा तर अभ्यासविषय आहेच. पण साम्यवादाला धरून ठेवत असतानाच चीनमध्ये घडत असलेल्या इंटरनेटविषयक घडामोडी जाणून घेणे तितकेच उद्‌बोधक ठरते. इंटरनेटच्या इतिहासात या घडामोडी निश्चितच नोंदल्या जातील. इतिहासाशी संबंधित अशा नानाविध पैलूंचा आलेख या अंकात चितारलेला दिसेल. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in या संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# थोडासा 'रो(रु)मानी' हो जाए...

'जिप्सी' म्हटले की कुणाला भटकणारा, बंधमुक्त, उत्च्छृंखल जीवन जगणारा आणि नाचगाण्यात रमणारा आनंदी माणसांचा गट आठवेल तर कुणा साहित्यप्रेमींना कविवर्य मंगेश पाडगांवकरांचा 'जिप्सी' हा काव्यसंग्रह आठवेल ! चारचाकींच्या बाजारपेठेची माहिती असणा-यांना खडबडीत रस्त्यांवरून धावू शकणारी मारुती कंपनीची 'जिप्सी' मोटार आठवेल! गंमत म्हणजे अलीकडे जनुकीय संशोधकांच्या आणि समाजशास्त्रज्ञांच्या वर्तुळात 'जिप्सी' गट चर्चेत आहे. हा 'जिप्सी' गट म्हणजे युरोपीय समुदायातील रोमानिया या देशातील 'रोमानी' लोकांचा गट आणि या गटाचे जनुकीय धागेदोरे आढळतात ते थेट भारतात ! 'थोडासा रूमानी हो जाए..' (म्हणजे थोडें हलकेफुलके, ताजेतवाने, आनंदी होऊ !) या हिंदी भाषेतील वाक्प्रचारानुसार 'रूमानी/रोमानी' बनून हे रंगीत धागेदोरे समजून घेऊ !

युरोपमधील विविध देशांमध्ये आजघडीला सुमारे एक कोटी 'रोमानी' नागरिक वास्तव्यास आहेत. अनेकविध प्रकारच्या चालीरीती, भाषा आणि जीवनशैली त्यांनी स्वीकारलेली दिसते. रोमानियातील अल्पसंख्य गटांमध्ये सर्वात मोठा वांशिक अल्पसंख्य गट म्हणून 'रोमानीं'ची ओळख आहे. अनेक देशांमध्ये विखुरलेल्या या 'रोमानीं'बाबतचे कुतूहल १९९०च्या दशकात अभ्यासकांच्या मनांत दाटले आणि 'रोमानीं'ना समजून घेण्याच्या दिशेने अभ्यास होऊ लागले. रोमानिया येथील अभ्यासकांनी तर हे अभ्यास केलेच; पण, त्याबरोबरच अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स या देशांमधील अभ्यासकांनीही काही अभ्यास केले. याच काळात जनुकीय संशोधनांनाही वेग आल्याने 'रोमानीं'च्या जनुकांचे संशोधन हाही त्या अभ्यासाचाच एक भाग बनला. नेदरलँड्स्मधील रॉटरडॅम विद्यापीठातील काही संशोधकांनी युरोपमधील 'रोमानी' नागरिकांच्या १३ गटांमधील १५२ 'रोमानीं'च्या जनुकीय संशोधनाचा अभ्यास-प्रकल्प चालू शतकात हाती घेतला होता.



'रोमानीं'च्या जनुकीय नकाशातील विविध घटक आणि भारत, मध्य आशिया आणि मध्य पूर्वेकडील देशांमधील नागरिकांच्या जनुकीय नकाशातील घटक यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला तेव्हा नागरिकांचे मूळ भारतात असल्याचे आढळते. संशोधकांच्या म्हणण्यानुसार भारताच्या वायव्येकडील प्रांतांतील, विशेषतः पंजाब प्रांतामधील नागरिकांच्या काही गटांनी साधारणपणे ५व्या शतकाच्या सुमारास तत्कालीन हिंदुस्थानाच्या सीमा ओलांडून स्थलांतर केले. त्या नंतर मध्य आशिया व मध्य पूर्वेकडील विविध समाजसमूहांबरोबर वास्तव्य करीत करीत (मात्र त्यांच्यात खूप मिळून मिसळून न जाता) ते गट बाल्कन प्रदेशातून पूर्व युरोपमध्ये पोहचले असावेत. मग बल्गेरिया येथून इसवी सन ११००च्या सुमारास ते युरोपमध्ये इतरत्र पसरले असावेत. अर्थात, या गटाचे हे स्थलांतर नक्कीच सुरळितपणे झाले नसणार. त्यांच्यातील अनेक जण काही ना काही कारणाने मृत्युमुखी पडल्याने निम्म्यापेक्षा कमी संख्येने हे नागरिक पूर्व युरोपमध्ये पोहचले असावेत, असा अभ्यासकांचा कयास आहे. युरोपमध्ये पोहचल्यानंतरही त्यांची संख्या घटती राहून सुमारे ३० टक्के नागरिक पूर्व युरोपमध्ये - प्रामुख्याने रोमानियात - स्थिरावले असावेत असे जनुकीय संशोधनाच्या आधारे दिसून येते असे अभ्यासक म्हणतात.

'रोमानीं'च्या 'रोमानी' भाषेत 'रोम' हा पुरुषवाचक शब्द असून 'रोम' म्हणजे पुरुष किंवा नवरा आणि त्याचे अनेकवचन 'रोमा. 'रोमानी' हा स्त्रीवाचक शब्द. हा गट भटकंती करीत करीत इजिप्तमधून आला असावा, असे समजून त्या गटाला पूर्वी 'इजिप्शियन' म्हटले गेले. इजिप्शियनचा संक्षेप होऊन 'जिप्सी' असे नाव या गटाला मिळाले (या गटाने रोमानियात अधिक काळ वास्तव्य केले म्हणूनही त्यांना 'रोमानी' असे म्हटले जात असावे?) काळाच्या ओघात 'रोमानी' असे नाव रूढ झाले असावे. त्यांच्या आचारविचारांवर काही प्रमाणात हिंदू संस्कृतीचा प्रभाव आढळतो. पूर्वी रोमानियातील 'रोमानी' लोक हे गुलामगिरीत अडकलेले होते. एकोणिसाव्या शतकात रोमानियातील गुलामगिरी संपुष्टात आल्यानंतर त्यांनी रोमानियातून अन्य देशांमध्ये स्थलांतर केले. तसेच, रोमानियातील ज्या प्रांतांमध्ये 'रोमानी' हे गुलाम नव्हते तिथे त्यांची लोकसंख्या वाढली.

रोमानियातील १९३०च्या जनगणनेनुसार रोमानियात 'रोमानी' नागरिकांची संख्या होती २ लाख ६२ हजार ५०१, म्हणजे, तेव्हाच्या एकूण लोकसंख्येच्या दीड टक्का इतकी. २०११च्या जनगणनेनुसार तेथील 'रोमानी' नागरिकांची संख्या आहे कोटींहून अधिक. दरम्यान, 'रोमानी' नागरिकांनी अन्य देशांत स्थलांतर केल्याने त्या देशांमध्येही 'रोमानी' नागरिकांचे गट तयार झाले. युरोपीय समुदायातील राष्ट्रांमध्ये विखुरलेल्या 'रोमानी' नागरिकांची राजकीय संघटना असावी, या चर्चेने पहिल्या महायुद्धानंतर जोर धरला होता.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तत्कालीन सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्याने पूर्व व पश्चिम युरोपमध्ये मोठे बदल घडून आले. या काळात 'रोमानी' नागरिकांची संख्या वाढू लागल्याने अभ्यासकांमध्ये त्यांच्याबाबतचे कुतूहल वाढले. जनुकीय अभ्यास करणा-यांच्या मते युरोपमध्ये वास्तव्य केल्यानंतरही 'रोमानी' नागरिक युरोपीय नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मिसळले नाहीत, म्हणजे त्यांनी युरोपमधील नागरिकांबरोबर विवाहसंबंध जूलवल्याचे दिसत तरी नाही. त्यांनी आपापसांत विवाह केले असण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे 'रोमानी' नागरिकांचे जनुकीय साधर्म्य हे साधारणपणे भारतीय नागरिकांशी मिळतेजुळते आहे, युरोपियनांशी नाही. कालांतराने रोमानी नागरिक विविध देशांत स्थिरावल्यानंतर व त्यांतील काहींनी युरोपियनांशी विवाह केल्यानंतर पुढील पिढ्यांमध्ये युरोपीय नागरिकंमधील जनुके आढळू शकतात. रोमानिया, हंगेरी, स्लोव्हाकिया, बल्गेरिया, क्रोएशिया या देशांतील 'रोमानी' नागरिकांच्या गटांतील काही मोजक्यांनी तेथील स्थानिकांशी विवाह केल्याने त्यांच्या पुढील पिढ्यांच्या जनुकांमध्ये बदल घडून आले असावेत, असे आजचे जनुकीय संशोधन सांगते. तर, पोर्तुगाल, स्पेन आणि लिथुआनिया येथील रोमानी नागरिकांनी पूर्वी तेथील स्थानिकांशी अधिक प्रमाणात विवाह केले असतील मात्र अलीकडच्या काळात पुन्हा रोमानी नागरिकांबरोबरच लग्नसंबंध जुळवण्याकडे त्यांचा कल राहिला असावा असे जनुकीय संशोधनांवरू न म्हणता येते, असे संशोधक म्हणतात. या पार्श्वभूमीवर 'रोमानी' नागरिकांची शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती कशी आहे यांबाबतही अभ्यास करण्यात येत आहे.



आर्थिकदृष्ट्या विचार केला तर रोमानियातील वंचित समाजसमूहां-मध्ये 'रोमानी' नागरिकांचा समावेश होतो. याचे एक मुख्य कारण म्हणजे 'रोमानी' नागरिकांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे. नोकरी मिळवण्यासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता व किमान कौशल्ये या गटाजवळ नाहीत. चांगले शिक्षण घेणा-या 'रोमानी' नागरिकांची संख्या फार कमी आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. त्यातही, ज्या 'रोमानी' नागरिकांच्या नोक-यांवर गदा आली त्यांनी सरकारदप्तरी 'बेरोजगार' अशी आपली नोंदणीही केलेली नाही, असे आढळले आहे.

एकूणांतील सुमारे ५० टक्के 'रोमानी' नागरिक हे उपजीविकेसाठी स्वयंरोजगाराचा पर्याय धुंडाळतात. त्यांचे काम हे बहुतांशी असंघटित क्षेत्रांत आणि कंत्राटी तत्त्वावर असावे. किमान ४. ३ अमेरिकी डॉलर हे एका माणसाचे दर दिवसाचे उत्पन्न असायला हवे हा अमेरिकेतील दारिद्र्यरेषा निश्चित करावयाचा निकष रोमानींच्या अभ्यासाच्या संदर्भात मानला तर सुमारे ५० टक्के 'रोमानी' नागरिक हे 'गरीब' गटांत मोडतात आणि किमान २.१५ अमेरिकी डॉलर हे एका माणसाचे दर दिवसाचे उत्पन्न असायला हवे, असा निकष मानला तर गरीब गटात मोडणा-या 'रोमानी' नागरिकांची संख्या घटेल. पण तरीही रोमानियातील अन्य नागरिकांच्या तुलनेत ते गरीब गटातच मोडले जातील. स्वाभाविकच, राहण्यासाठी जागा मिळविणे हे त्यांच्यासाठी कठीण काम ठरते. सुमारे ८३ टक्के 'रोमानी' नागरिक शहरांच्या वा गावांच्या परिघाच्या परिसरात वास्तव्यास असतात. सुमारे ३० टक्के नागरिकांना अडचणीत वास्तव्य करावे लागते. एका छोट्या खोलीत सरासरी तीन 'रोमानी' नागरिक वास्तव्यास असतात आणि एका 'रोमानी' नागरिकाला सरासरी १२. ६चौरस मीटर एवढीच जागा निवासासाठी उपलब्ध होते. सार्वजनिक सेवासुविधांपासूनही हे नागरिक अनेकदा वंचित राहतात. सुमारे १५ टक्के 'रोमानी' नागरिकांना राहत्या घरामध्ये वीज उपलब्ध होत नाही. या तुलनेत रोमानियातील अन्य वंशियांमधील फक्त २ टक्के नागरिकांना वीज मिळत नाही. सुमारे २७ टक्के नागरिकांना नळाद्वारे पाणी मिळते तर अन्य वंशियांमधील सुमारे ९० टक्के नागरिकांना नळाद्वारे पाणी मिळते. ***(पृष्ठ २२वर पाहावे)***

राजकीय

# महाजालाच्या चिनी मैदानात

चीनने आपल्या सर्व नागरिकांना खेळण्यासाठी एक मोठ्ठे मैदान उपलब्ध करून दिले आहे. भौगोलिकदृष्ट्या अवाढव्य असलेल्या आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या चीनमधील नागरिकांना पुरेल असे हे मैदान आहे महाजालाचे म्हणजे इंटरनेटचे. अन्य देशांतही हे मैदान आहेच पण या 'महाजालच्या चिनी मैदाना'चे वैशिष्ट्य असे की चिनी सरकारने फार चलाखीने त्याभोवती एक बंदिस्त कुंपणही उभारले आहे. या 'बंधनात जेवढे खेळायचे तेवढे खेळा,' असे चिनी सरकारचे धोरण आहे. म्हणजे, चिनी नागरिक इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात; पण नागरिकांच्या वापरावर सरकारचे बारकाईने लक्ष आहे. सरकारला आक्षेपार्ह वाटत असलेल्या बाबी तेथील इंटरनेटवर उपलब्ध होतच नाहीत. चीनमध्ये हे कसे शक्य होते?

इंटरनेटचा प्रसार होत असतानाच्या काळातच चिनी सरकारने यासाठी उपाययोजना केली होती. चिनी सरकारच्या हाताशी एक मोठी सेना सज्ज आहे. सायबर पोलिस, संगणक अभियंते, संगणकप्रणालींचे तज्ज्ञ, इंटरनेटच्यामार्फत सरकारी धोरणांचा प्रचार-प्रसार करणारे कर्मचारी, नागरिकांच्या इंटरनेटच्या वापरावर लक्ष ठेवून त्यांना मार्गदर्शन (?) करणा-या आणि नागरिकांच्या संदेशांमध्ये सरकारी दृष्टीने काही चुकीचे आढळल्यास ते त्वरित रोखण्याचे काम इमानेइतबारे करणा-या कर्मचा-यांचा मोठा गट अशा अनेकांचा त्या सेवेत समावेश आहे. महाजालात काम करणा-या अनेक खाजगी कंपन्या असून साम्यवादी पक्षाच्या चौकटीतच काम करण्याची मुभा त्यांना आहे. नागरिकांच्या इंटरनेटच्या वापरावर काही ना काही निर्बंध आणणा-या चिनी सरकारने महाजालाशी संबंधित व्यापारी बाजू मात्र नेमकेपणाने हेरली आहे. साम्यवादी पक्षाने आखलेली राष्ट्रीय उद्दिष्टे गाठत असतानाच महाजालाच्या मदतीने व्यापार वाढवण्यासाठी चिनी सरकारने अलीकडे प्रयत्न सुरू केले आहेत.



महाजालाच्या चिनी मैदानात परकीय कंपन्यांना मात्र प्रवेश नाही. जगभरात प्रसिद्ध झालेले 'गुगल', 'फेसबुक', 'ट्विटर' आणि 'यू ट्यूब' तिथे नाही. 'फेसबुक'चा चिनी अवतार आहे Renren आणि Sina तर, 'ट्विटर'चा अवतार आहे Sina Weibo. चिनी सरकारला आक्षेपार्ह वाटत असलेला मजकूर गाळून चीनमध्ये सेवा देण्याचे 'गुगल'ने २००६मध्ये मान्य केले. पण २०१०मध्ये 'गुगल'ने आपली सेवा थांबवली. मुख्य म्हणजे, चिनी सरकारने निर्बंध घातले म्हणून नव्हे तर चीनमध्ये 'गुगल'ची सेवा 'हॅक' करण्याचा प्रयत्न झाला म्हणून 'गुगल'ने आपली सेवा थांबवण्याचा निर्णय घेतला होता. चीनमधील नेत्यांना अडचणीत आणणारा परदेशांतील मजकूर व्यवस्थितपणे गाळून चिनी नागरिकांपर्यंत पोहचतो किंवा पूर्णपणे काढून टाकला जातो. सरकारच्या विरोधात असणा-या नागरिकांचे ई-मेल तर नेहमीच 'हॅक' केले जातात. आता, 'गुगल'सारखी सेवा देणारे Baidu हे 'सर्चइंजिन' चीनमध्ये वापरले जाते आहे. चिनी नागरिकांच्या समाजजीवनावर सर्वांत जास्त प्रभाव पाडला आहे तो Sina Weiboने. मोजक्या शब्दांमध्ये बातम्या आणि मते पोहचवणारी ही सेवा नागरिकांना आकर्षित करणारी ठरली आहे.

चीनमधील माहितीच्या महाजालातील घडामोडी या एका प्रकारे उंदीर-मांजरासारख्या आहेत, असे म्हणता येईल. लहानमुलांच्या करमणुकीच्या असलेल्या 'टॉम व जेरी' या कार्टून मालिकेप्रमाणे एकाने दुस-यावर कुरघोडी करण्यासाठी सतत तयार असणे, असे काहीसे तिथे घडते. म्हणजे, एकीकडे महाजालाचा वापर नागरिक फार मोठ्या संख्येने करीत आहेत, त्यांची संवादक्षमता फार वेगाने वाढते आहे; तर दुसरीकडे त्याच वेळी नागरिकांनी सरकारविरोधी व लोकशाहीसमर्थक अशी कोणतीही कृती करू नये यासाठी त्यांच्या संवादावर खास लक्ष ठेवण्यासाठी प्रशासनालाही तितक्याच वेगाने कार्यक्षम बनणे गरजेचे झाले आहे. माहितीच्या महाजालापासून नागरिक वंचित राहता कामा नये, पण त्यांनी सरकारला धोका निर्माण करणारी कृतीही करू नये, यासाठी प्रशासनाला डोळ्यांत तेल घालून बसावे लागते आहे. परिणामी, महाजालातील संभाषणावर नियंत्रण ठेवणारी एक गुंतागुंतीची खर्चिक व्यवस्था तिथे आकारली आहे.

चिनी सरकारने नियंत्रणाचे दोन मार्ग अवलंबले आहेत. एक आहे 'ग्रेट फायरवॉल'. म्हणजे, परदेशांमधील संकेतस्थळे ब्लॉक करणारी संगणक यंत्रणा. १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धात कार्यान्वित करण्यात आलेल्या या यंत्रणेवर सुमारे १६ कोटी अमेरिकी डॉलर खर्च करण्यात आले असावेत असा अंदाज आहे. चिनी सरकारच्या गोटातून मात्र याबाबत कोणतीच वाच्यता केली जात नाही. चीनच्या या यंत्रणेच्या संदर्भात 'ग्रेट फायरवॉल' हा उल्लेख प्रथम १९९७मध्ये 'वायर्ड' या पाश्चात्य मासिकातील एका लेखात करण्यात आलेला होता.

चिनी नियंत्रणाचा दुसरा मार्ग 'गोल्डन शील्ड' असा आहे. आपल्याच देशांतील नागरिकांचा 'महाजालीय संवाद' समजून घेऊ न त्या संवादाची दिशा व उद्देश ओळखून त्यावर नियंत्रण ठेवणारी ही यंत्रणा होय. १९९८मध्ये कार्यान्वित झालेल्या या यंत्रणेवर सुमारे १.६ अब्ज अमेरिकी डॉलर खर्च करण्यात आले असावेत, असे म्हटले जाते. नागरिकांच्या महाजालाच्या वापरावर विशेष लक्ष ठेवणा-या सरकारच्या विविध खात्यांच्या/ विभागांच्या आपापल्या यंत्रणा आहेत. प्रांतीय आणि स्थानिक प्रशासनावर-देखील महाजालावर विशेष लक्ष ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नागरिकांनी उठाव करू नये, समाजात अस्वस्थता निर्माण करू नये यासाठी स्थानिक पातळीवर विशेष काळजी घेण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, संगणक क्षेत्रातील ही नियंत्रणाची जबाबदारी सांभाळण्यासाठी सुमारे १०० कंपन्या कार्यरत आहेत आणि त्यांनी सुमारे १२५ वेगवेगळया संगणकप्रणाली तयार केल्या आहेत, असे सरकारी कागदपत्रांवरून समजते. सरकारला सेवा देणा-या एका कंपनीच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार संवेदनक्षम अशी समजली जाणारी माहिती सर्वप्रथम बाजूला केली जाते. उदाहरणार्थ, 'तिआनमेन चौका'तील घटना म्हणजे '४ जून'चा संदर्भ आला की त्यावर विशेष कृती केली जाते. सरकारच्या विरोधात झालेल्या अन्य काही विशिष्ट घटना घडलेले दिवस लक्षात घेऊ न त्या बाबतची माहिती, 'चार्टर ०८' (सरकारच्या विरोधातील जाहीरनामा) तसेच (सरकारविरोधी?) सामूहिक कृती वा निदर्शनाच्या काही स्थानिक घटना अशा बाबींची माहिती उपलब्ध होतच नाही.



गंमत अशी की सरकारी विभागाच्या वा अधिका-यांच्या विरोधातील एखादा अहवाल वा लेख महाजालात असेल तर तो 'ब्लॉक' करण्याचे तंत्रज्ञान संबंधित अधिका-यांनाही उपलब्ध होऊ शकते. असे तंत्रज्ञान विकणा-या कंपन्यांची उलाढालही लक्षावधींच्या घरात आहे. कोणत्या प्रांतातील कोणता मजकूर 'ब्लॉक' करावयचा याचेही काही निकष तिथे वापरले जातात. उदाहरणार्थ, तिबेटच्या प्रश्नामुळे तिबेट हा विषय अतिसंवेदनशील आहे. त्यामुळे, तिबेटमधील नागरिकांनी लिहिलेले सुमारे ५० टक्के 'ब्लॉग' (blog) हे विशिष्ट पद्धतीने 'ब्लॉक' केले जातात, तर अन्य प्रांतांमधील फक्त दहा टक्के 'ब्लॉग' हे 'ब्लॉक' केले जातात. प्रत्येक 'ब्लॉग'मधील मजकूर संपूर्णपणे वाचून मगच तो 'ब्लॉक' करण्यात येतो. Renren आणि Sina आणि Weibo या सर्वांच्या बाबतीत अशी पद्धत वापरली जाते. त्यामुळे सरकारला यासाठी फार मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च तंत्रज्ञानावर तर होतोच; पण तंत्रज्ञान वापरणा-या कर्मचा-यांवरही होतो. त्यामुळे सरकारी तिजोरीवर बोजा पडतो.

माहितीच्या महाजालात विविध कामे करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वेग फार वाढतो आहे तसेच माहितीच्या महाजालाचा उपयोग करणा-यांची संख्याही सतत वाढते आहे. त्यामुळे महाजालातील सरकारच्या पोलिसांवर कामाचा ताण वाढतो आहे. चिनी सरकारला इथे आणखी एक बाब लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे तंत्रज्ञान वापरणारी माणसेच आहेत आणि माणसांकडून चुका होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे कधीतरी संवेदनशील मजकूर नागरिकांपर्यंत पोहचू शकतोच. तंत्रज्ञान वापरणारे नागरिकही हुशार असतात आणि एखाद्या त्रुटीचा उपयोग ते करू न घेऊ शकतात. तसेच एखाद्या आणीबाणीच्या परिस्थितीत महाजालातील सर्व मजकूरावर नियंत्रण ठेवणे अवघड बनते. अशा वेळी कधीकधी वेगळ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. चीनमध्ये २०११मध्ये झालेल्या एका मोठ्या रेल्वेअपघाताच्या वेळी महाजालातील विविध सेवांचा उपयोग करणे ही नागरिकांची तातडीची गरज बनली होती. तेव्हा नागरिकांच्या सर्व प्रकारच्या संदेशांची देवाणघेवाण खूप वाढली होती. त्या वेळी महाजालातील मजकूरावर नियंत्रण ठेवणा-या पोलिसांची संख्या फारच अपुरी पडली होती.

अशा वेळी चिनी सरकारचे अतिरेकी नियंत्रण मान्य नसणारे अनेक जण कोणत्या ना कोणत्या मार्गाने सरकारबाबतची नाराजी परदेशांत पोहचवतात व सरकारच्या या संदर्भातील त्रुटी निदर्शनास आणून देतात. अमेरिकेत राजकीय आश्रय घेतलेले सरकारविरोधी चिनी नागरिक Xieo Qiang हे China Digital Times असा 'ब्लॉग' लिहितात. Ministry of Truth असे म्हणून सरकारच्या काही धोरणांची माहिती ते उघडकीस आणतात. असे असले तरी चीनमधील बहुतेक घडामोडी या बंदिस्त महाजालाच्या चौकटीतच राहतात. कारण महाजालात काम करणा-या अनेक कंपन्यांचे मालक चिनी सरकारच्या मर्जीतील आहेत. ते आपल्या खास गोटातील असावेत याची काळजी चिनी सरकारने घेतली आहे. या शिवाय अनेक कंपन्यांच्या कामकाजात राजकीय नेत्यांचा अप्रत्यक्ष सहभाग असतो किंवा त्यांच्या अतिविश्वासातील माणसे तिथे पेरलेली असतात. या कंपन्यांसाठी विशेष आचारसंहिता व नियम असतात. आचारसंहिता व नियम पाळणा-यांच्या कामकाजात बाधा येत नाही. मात्र, त्यांचा भंग करणा-यांवर कारवाई केली जाते. उदाहरणार्थ, आपली कंपनी काही ठरावीक निधी हा 'सायबर सेन्सर्स' म्हणून काम करणा-यांसाठी राखून ठेवेल, असे एक बंधन कंपन्यांसाठी आहे. हे 'सायबर सेन्सर्स' आपले काम प्रामाणिकपणे व चोखपणे करतील याचीही काळजी घेतली जाते.

चीनमधील 'ब्लॉग'बाबत एक अभ्यास हार्वर्ड विद्यापीठात करण्यात आला होता. त्या वेळी असे आढळले की सरकारच्या धोरणांवर थोडीफार टीका करणारे लेखन खपवून घेतले जाते. मात्र, सरकारच्या समर्थनार्थ वा विरोधार्थ नागरिक एकत्र जमणार नाहीत याची काळजी घेतली जाते आणि तसे घडवून आणण्याची शक्यता असणारा मजकूर महाजालातून काढून टाकला जातो. (अरब देशांतील घडामोडी लक्षात घेऊन) सरकार व समाज अस्थिर करू नका, राजकीय पक्षाच्या विरोधात काही करू नका, असे साधारणतः चिनी सरकारचे धोरण आहे. 'जगा आणि जगू द्या' या धर्तीवर सांगायचे झाले तर 'आम्ही सांगतो तसा महाजालाचा उपयोग करा' म्हणजे 'तुम्हीही जगा' आणि 'आमच्यासह अन्य सर्वांना सुखाने जगू द्या', असा हा साम्यवादी खाक्या आहे.



चिनी सरकारची ही भूमिका केवळ कागदोपत्रीच राहिलेली नाही. १९९६मध्ये चीनमध्ये इंटरनेटचा वापर बराच मर्यादित होता, तेव्हापासून चिनी सरकारने ही भूमिका सातत्याने घेतली आहे. परदेशांमधील संकेतस्थळे चीनमध्ये दिसू नयेत याची काळजी चीनमध्ये तेव्हापासूनच घेतली जात होती. सप्टेंबर १९९६मध्ये चीन व जपान यांच्यातील राजकीय संबंधांबाबत काही प्रश्न निर्माण झाले होते तेव्हा याबाबत इंटरनेटच्या माध्यमातून वादचर्चा घडू नये यासाठी चिनी सरकारने कृती केली होती. त्या नंतर १९९७मध्ये हाँगकाँग येथे झालेल्या एका परिषदेत इंटरनेटवरील मजकुराला चाळणी लावता येईल अशा संगणकप्रणालीबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न चीनने केला होता. अमेरिकेतील एका मासिकाला सुमारे ३० हजार चिनी नागरिकांचे ई-मेल पत्ते पाठविल्यावरून एका चिनी युवकावर १९९८मध्ये खटला दाखल करण्यात आला होता. लोकशाही समर्थक चिनी नागरिकांनी चीनमध्ये तसेच अन्य देशांतील २००९मध्ये प्रांतातील वांशिक दंगलीच्या बातम्याही इतरत्र पसरू नयेत यासाठी त्या प्रांतातील इंटरनेट सेवा ठप्प करण्यात आली होती (याला kill switch असे म्हटले जाते). लोकशाही समर्थक नागरिकांबरोबर कोणत्याही प्रकारचा संपर्क करू नये यादृष्टीने चिनी सरकारने तेव्हापासून आजपर्यंत इंटरनेटच्या वापरावर विशिष्ट बंधने घातली आहेत.

चिनी नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन करण्यासाठी तसेच काही विशिष्ट संवेदनशील बाबींवर (सरकारी) मतप्रदर्शन करण्यासाठी चिनी सरकारने २००५पासून 'वेब समालोचक' (Web Commentators) नेमलेले आहेत. दर एका 'वेबपोस्ट'साठी त्यांना 50 Chinese cents दिले जातात म्हणून त्यांना 50-Cent Party असे म्हटले जाते. नागरिकांच्या इंटरनेटच्या वापरावर बंधने घालणे हा एक भाग झाला पण साम्यवादी पक्षाच्या नेत्यांनी इंटरनेटचा उपयोग करून घेऊन आपला प्रभाव (व दबाव?) वाढवला पाहिजे, असे मत राजकीय पक्षाच्या नेत्यांनी मांडले आहे. विशेषतः, २००९नंतर चिनी नागरिकांची मते Sina Weibo वर (व जगभरात 'ट्विटर'वर) सातत्याने व जोरकसपणे मांडण्यात येऊ लागल्यावर चिनी नेत्यांना या सर्व बदलांची व मतांची दखल वेगाने घेणे भाग पडते आहे.

चिनी ‘ट्विटर’वर म्हणजे Sina Weiboवर एक गंमत अशी आहे की एखाद्या नागरिकाने केलेले ‘ट्विट’ सरकारला आक्षेपार्ह वाटले तर ते ‘ट्विटर’कर्त्याशिवाय अन्य नागरिकांना दिसतच नाही. Sina Weiboवर अशा प्रकारे मर्यादित स्वातंत्र्य देतानाही नागरिकांनी आपली खरी नावे व खरी माहिती इंटरनेटवर द्यावी यासाठी सरकारने बरेच प्रयत्न केले. पण दरवेळी असे प्रयत्न यशस्वी झालेच असे नाही. त्यामुळेही याद्वारे होणा-या विविध संभाषणांमध्ये सरकारला हस्तक्षेप करणे भाग पडते आहे.

अशा मर्यादित स्वातंत्र्यामध्येही लोकशाहीप्रेमी नागरिकांना आनंद व्हावा अशी एक घटना घडली आहे. Pan Shiyi हे चीनमधील अतिश्रीमंतांमधील एक. Sina Weiboवर ते सतत ‘ट्विट’ करत असतात. त्यांचे ‘ट्विट’ वाचणा-यांची संख्याही लाखोंच्या घरात आहे. चीनमधील वायूप्रदूषणाच्या संदर्भात प्रशासनाला जागे करून वायूप्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने कृतिशील बनण्यासाठी त्यांच्या ‘ट्विट’ने मोलाची कामगिरी केली. त्यांच्या ‘ट्विट’वर असंख्य मते व्यक्त केली जात होती. त्यांवर Pan Shiyi पुन्हा आपले मत मांडत होते. या सर्व मतांची दखल सरकारी पातळीवर घेतली जात होती. चीनमधील वृत्तपत्रांनाही या विषयाची चर्चा करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. त्या नंतर प्रदूषण कमी व्हावे यासाठी सरकारने उपाययोजना आखली. या घटनेबाबत Pan Shiyi यांनी मात्र सांभाळून प्रतिक्रिया दिली आहे. साधारणपणे राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयांबाबत ते मते व्यक्त करीत नाहीत. मात्र, स्वच्छ हवा हा विषय राजकीय नेत्यांसह सर्वच चिनी नागरिकांच्या आरोग्याचा विषय असल्याने त्याबाबत ‘ट्विट’ करणे आवश्यक बनले होते आणि आजपर्यंत त्यांचे एकही ‘ट्विट’ सरकारी कात्रीत अडकलेले नाही, असे ते सांगतात. राजकीय नेत्यांच्या दृष्टीने चीनमध्ये हा एक सूक्ष्म असा बदल घडतो आहे. आरोग्य, नागरी सुविधा वा अन्य सामाजिक प्रश्नांबाबत नागरिक आपली मते प्रभावीपणे मांडू पाहत आहेत. त्यांच्या मतांची योग्य ती दखल घेऊन प्रशासनाने सुयोग्य बदल व सुधारणा करणे हे सरकारच्या व नागरिकांच्या दोघांच्या हिताचे आहे. तर, नवमाध्यमांची ही सेवा खंडित करण्याचा अधिकार सरकारला आहेच. त्यामुळे थोडे बदल स्वीकारणारी ही ‘लवचीक हुकुमशाही’ आहे, असे म्हटले जाते.



या ‘लवचीक हुकुमशाही’मध्ये तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सर्वांत मोठा सहभाग आहे तो ‘ग्रेट फायरवॉल’चे जनक असलेले Fang Binxing यांचा. चिनी सरकारला जरी त्यांची मदत झालेली असली तरी नागरिकांमध्ये मात्र त्यांच्याबाबत नाराजी आहे. त्यांच्या ‘ट्विट’वर प्रतिक्रिया देताना अनेक जण ‘चालते व्हा’ अशा आशयाचे चिनी वाक्य लिहित असतात. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांची भाषणे होत असतात. एका ठिकाणी तर विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर अंडी व बूट फेकले होते. या घटनेची माहिती इंटरनेटवर देताना एका विद्यार्थ्याचे पायात बूट नसलेले चित्र दर्शविण्यात आले होते. Fang Binxing यांनी ‘ग्रेट फायरवॉल’ची निर्मिती कशी केली याचे उत्तर मात्र कोणालाच सांगता येत नाही. इंटरनेटच्या अभ्यासकांसाठी तर तो एक संशोधनाचा विषय आहे. गुन्हेगाराचा माग घेण्यासाठी पोलिसांकडे जसे श्वानपथक असते तसे काहीसे चीनमधील इंटरनेटसेवेत घडत असावे आणि सरकारच्या सायबर पोलिसातील श्वानपथक विशिष्ट शब्दांचा वा मजकूराचा असा माग घेत असावेत, अशी उपमा ‘ग्रेट फायरवॉल’च्या कार्याला काहींनी दिली आहे. सरकारला आक्षेपार्ह वाटत असलेल्या शब्दांचा वा घटनांचा शोध कोणी इंटरनेटवर घ्यायचा प्रयत्न केला तर त्यांचा शोधाचा मार्ग बंद होतो. जणू एकदम ‘डेड एन्ड’! गंमत अशी की असे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी चीनने चक्क ‘गुगल’लाच ‘टार्गेट’ केले होते असेही म्हटले जाते. ‘ग्रेट फायरवॉल’चे काम नीट चालू शकते की नाही याची जणू ‘ट्रायल’च ‘गुगल’वर घेण्यात आली होती, असे म्हटले जाते. चीनमधील उद्योग व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणा-या यंत्रणेमार्फत ‘ग्रेट फायरवॉल’ची निर्मिती करण्यात आली आहे.

माहितीच्या महाजालाचा विस्तार जगभरात होऊ लागला तेव्हा या महाजालामुळे चीनमध्ये लोकशाही स्थापन होण्यास मदत होईल, असा एक राजकीय अंदाज मांडण्यात आला होता. मात्र आजघडीला करोडो चिनी नागरिक या महाजालाचा वापर करीत असले तरी याच महाजालाचा उपयोग करूनही चीनने हा अंदाज फोल ठरवला आहे आणि राजकारणावरील व समाजकारणावरील आपली पोलादी पकड अधिकच घट्ट केली आहे, ही मात्र वस्तुस्थिती आहे. ■■

इतिहास

# इतिहास आणि वस्तुनिष्ठता

इतिहास आणि तत्त्वज्ञान या दोहोंत एक साम्य आहे. 'कोऽहं' या अनंत काळापासून उत्तर न उलगडलेल्या प्रश्नाचा शोध घेत राहणे, हा तत्त्वज्ञानाच्या प्रांताचा गाभा होय. दुस-या शब्दांत मांडायचे तर, 'स्व'चा शोध अनादी कालापासून चालत आलेला आहे आणि तो अप्रतिहत चालणारा आहे. याच प्रश्नाचा वेध घेणारी ज्ञानशाखा म्हणजे तत्त्वज्ञान. इतिहास हाही एका अर्थाने आत्मशोधच असतो. तत्त्वज्ञान आणि इतिहास या दोन ज्ञानशाखांमधील एक साम्यस्थळ ते हेच. परंतु, तत्त्वज्ञान आणि इतिहासातील आत्मशोधामध्ये एक अतिशय मूलभूत फरक आहे. तत्त्वज्ञानाच्या प्रांतातील आत्मशोध हा प्रत्येक व्यक्तीने स्वतःच, स्वतःच्या ठायी घ्यायचा असतो. इतिहासाच्या प्रांगणातील 'स्व'चा शोध हा मात्र समाजसापेक्ष असतो. 'मानव, समाज, स्थल आणि काल' या अनुबंध-चतुष्टयाच्या चौकटीत हा शोध चालू राहतो. अखंडपणे चालणा-या या शोधाला व्यष्टी आणि समष्टी यांच्यादरम्यानच्या नात्याचे अस्तर असते. मुळात, 'इतिहास' हीच अनवरत चालणारी सजीव प्रक्रिया असल्याने हा शोधही सतत चालणारा असतो.

*पुणे विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय संशोधन व अध्ययन विभागाचे प्रमुख आणि इतिहासाचे एक ज्येष्ठ अभ्यासक व संशोधक गणले जाणारे प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी "इतिहास आणि वस्तुनिष्ठता" या विषयावर दोन दिवसांची एक व्याख्यानमाला अगदी अलीकडेच गुंफली. पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार सभागृहात तारीख २५ व २६ मे २०१३ या दोन दिवशी आयोजित करण्यात आलेल्या त्या व्याख्यानांतील विवेचनाचा सारांश 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी या ठिकाणी आवर्जून सादर करीत आहोत. इतिहास, इतिहासाचे पुनर्लेखन, इतिहासाची साधने, त्या साधनांची विश्वासार्हता... यांसारख्या अनेकानेक मुद्द्यांवरून वादविवादांचा धुरळा उडणा-या सध्याच्या वातावरणात इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेसारख्या एका संवेदनशील पैलूबाबतचे हे प्रगल्भ विवेचन आपल्या सगळ्यांच्याच आकलनकक्षा विस्तारणारे ठरावे* - ***संपादक***



'इतिहास' या संकल्पनेची व्याख्याही तितकीच प्रवाही राहिलेली आहे. 'इतिहास म्हणजे काय ?' (व्हॉट इज् हिस्टरी ?) हा विख्यात इतिहासज्ञ ई. एच. कार यांचा विद्वत्मान्य बहुचर्चित ग्रंथ १९६१ साली प्रकाशित झाला. इतिहास, इतिहासाची व्याख्या, त्या व्याख्येची व्याप्ती, इतिहासलेखन... यांसारख्या अनेक आनुषंगिक पैलूंच्या विवेचन व चर्चेला त्या ग्रंथाच्या प्रसिद्धीपासून चौफेर बहर आला. इथे आवर्जून नोंदविण्यासारखी एक बाब म्हणजे, प्रा. कार यांच्या ग्रंथातील अनेकानेक पैलूंबाबत आजही विचारमंथन अव्याहत चालूच आहे. प्रा. कार यांच्या त्या जगप्रसिद्ध ग्रंथाच्या प्रकाशनाचा रौप्यमहोत्सव १९८६ साली साजरा करण्यात आला. तो मुहूर्त साधून, प्रा. कार यांनी त्यांच्या मूळ ग्रंथात उपस्थित केलेल्या काही पैलूंची चर्चा पुढे नेणारा "व्हॉट इज् हिस्टरी टुडे ?" या शीर्षकाचा एक संपादित ग्रंथ १९८८ साली प्रकाशित करण्यात आला. प्रा. कार यांच्या मूळ ग्रंथाचा सुवर्णमहोत्सव २०११ साली साजरा करण्यात आला. त्या वेळी, 'व्हॉट इज् हिस्टरी नाउ ?', या शीर्षकाचा, आधीच्या दोन ग्रंथांतील विषयांची चर्चा अधिक पुढे नेणारा आणखी एक ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. 'इतिहास' या सजीव संकल्पनेसंदर्भातील ऊहापोह इतिहासाइतकाच सजीव आणि प्रवाही असल्याचा हा पुरावाच जणू.

'इतिहास' या संकल्पनेची जी क्षितीजकक्षा प्रा. कार यांच्या दृष्टिसमोर होती तिच्या तुलनेत इतिहासाची क्षितीजकक्षा आज किती तरी विस्तारलेली आहे. "इतिहास म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची कालानुक्रमानुसार केलेली प्रामाणिक नोंद", ही इतिहासाची एक सर्वमान्य व आद्य व्याख्या. पुढे या व्याख्येचा पैस अधिक विस्तारला. "इतिहास म्हणजे केवळ घडून गेलेल्या घटनांची कालानुक्रमानुसार केलेली नोंदच नव्हे तर, इतिहास म्हणजे घडून गेलेल्या घटना व त्या घटनांना प्रेरक ठरलेल्या कारणांचीही जंत्री", अशी व्याख्या मग मांडली जाऊ लागली. यथावकाश, या व्याख्येत इतिहासकालीन घटनांना कारणस्वरूप ठरणा-या व्यक्तिमत्त्वांचा मागोवा घेण्याच्या पैलूचाही समावेश झाला. इतिहासाची वाटचाल द्वंद्वात्मकतेमधून होत असल्याने, "इतिहास म्हणजे क्रिया व प्रतिक्रियांच्या द्वंद्वात्मक वाटचालीचा आलेख', अशी मार्क्सप्रणित मांडणीही

मग सादर झाली. ‘‘यच्चयावत मानवी इतिहास हा अखेर विचारांच्या प्रवासाचा आलेख वा इतिहास होय’’, या कॉलिंगवुडकृत व्याख्येपर्यंत आजमितीस ‘इतिहास’ या संकल्पनेच्या व्याख्येचा प्रवास झालेला दिसतो. इतिहासविषयांच्या कक्षेचाही या संपूर्ण प्रवासादरम्यान विस्तार झालेला आहे. ऐतिहासिक कर्तृत्व गाजविलेल्या अलौकिक व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाची गाथा, ही ‘इतिहास’ या संकल्पनेची एकेकाळची कक्षा होती. केवळ अभिजन अथवा सत्ताधारी वर्गाच्या कामगिरीचीच नोंद ठेवण्याच्या त्या कक्षेला पुढे छेद बसला. अभिजनांच्या बरोबरीनेच बहुजन, वंचित यांसारख्या समाजस्तर अथवा घटकांमधील व्यक्तींचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा, कामगिरीचा आलेख लेखाटणारे इतिहास लिहिले जाऊ लागले. ‘तळाकडून इतिहास’ यांसारख्या संकल्पनांचा इतिहासलेखनाच्या प्रांतातील उदय ही याच प्रवाहाची एक परिणती. इतिहासाची मांडणी वेगवेगळ्या भूमिकांच्या भिंगांतून करण्याचा प्रवाहही याच काळात समांतर पद्धतीने विकसित होत राहिलेला दिसतो. समाजवादी, बहुजनवादी, स्त्रीवादी, राष्ट्रवादी... यांसारख्या भूमिकांचा अंगीकार करून इतिहासाचे लेखन आणि इतिहासकालीन घटनांचे अन्वय लावण्याची पद्धती त्या प्रवाहातूनच निपजलेली दिसते.

**इतिहासलेखन, वस्तुनिष्ठता आणि सापेक्षता**

इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेच्या पैलूबाबतचे विवेचन आपल्याला या सगळ्या प्रवाहांचे नीट भान ठेवूनच करणे भाग ठरते. इतिहासकालीन घटनांची नोंद कालानुक्रमाने करीत असताना त्यात वस्तुनिष्ठता असलीच पाहिजे, असा आग्रह थेट १९व्या शतकापासून धरला गेलेला दिसतो. रान्ते हे ज्येष्ठ इतिहासविवेचक या भूमिकेचे पुरस्कर्ते. त्यामुळे, इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेचा इतका काटेकोर आग्रह धरणा-यांची फळी ‘रान्ते संप्रदाय’ म्हणूनच ओळखली जाते. ऑगस्त कॉम्प्तसारखा विचारवंत तर त्याही पुढे जात इतिहासाला ‘सोशल फिजिक्स’ म्हणजे ‘सामाजिक पदार्थविज्ञान’ अशीच संज्ञा बहाल करतो. साहजिकच, ऐतिहासिक वास्तवाची नोंदणी वैज्ञानिक पद्धतीने आणि काटेकोर शिस्तीने झाली पाहिजे, अशी भूमिका कॉम्प्त हिरिरीने प्रतिपादन करतात. एकंदरीने या सगळ्याच विचारसरणीवर न्यूटन यांच्या शास्त्रीय विश्लेषणपद्धतीचा पगडा असल्याचे जाणवते.



अर्थात, इतिहासकालीन तथ्यांची नोंदणी काटेकोर आणि वैज्ञानिक शिस्तीने करण्याचा आग्रह धरणा-या या विचारपद्धतीबाबत त्या काळातही काही वर्तुळांत असंतोष होताच. आइन्स्टाईन यांनी १९०५ साली सिद्ध केलेल्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतामुळे विज्ञान, वैज्ञानिक तथ्यांचे आकलन, वैज्ञानिक घटनांकडे बघण्याची दृष्टी या सगळ्यांतच आमूलाग्र परिवर्तन घडून आले. सापेक्षतावादाच्या सिद्धांताचे पडसाद नैसर्गिक शास्त्रांप्रमाणेच सामाजिक शास्त्रांच्या प्रांगणातही उमटले. याचा एक परिणाम असा झाला की, त्यामुळे इतिहास, इतिहासाचे लेखन आणि इतिहासकालीन तथ्यांचे दस्तऐवजीकरण वा नोंदणी यांबाबतचे तेथवरचे सगळे आकलनच एकदम बदलून गेले.

इतिहासाचे लेखन करणारा इतिहासलेखक अथवा इतिहासकार हा वस्तुनिष्ठ असावा, अशी सगळ्यांचीच कायम अपेक्षा असते. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची नोंद, इतिहासातील तथ्यांची नोंदणी साधार केली जावी, हेच इतिहासलेखनात अपेक्षित असते. असे सत्यशोधन आधारसाहित्य व पुराव्यांनी मंडित असावे, अशीही एक अपेक्षा असते. इतिहासलेखनाच्या या सगळ्याच प्रक्रियेमध्ये इतिहासकाराची भूमिका विलक्षण कळीची ठरते. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांना जोडणारा दुवा, ही इतिहासलेखकाची वास्तवातील भूमिका असते. पूर्वी घडून गेलेल्या भूतकालीन घटनांची नोंद इतिहासकार वर्तमानकाळात जगताना करत असतो. वर्तमानकाळात स्थित होऊन भूतकालीन घटनांचा घेतलेला वेध, केलेली नोंदणी म्हणजे इतिहासलेखन असते.

पूर्वी घडून गेलेल्या तथ्यांची वर्तमानात बसून वस्तुनिष्ठपणे नोंद करायची तर इतिहासलेखकाला आधारभूत संदर्भसाहित्याची गरज भासते. त्यामुळे, इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेचा मुद्दा येतो त्या वेळी इतिहासकालीन घटनेचे तथ्य स्वरूप उलगडण्यासाठी आवश्यक असलेल्या पुराव्यांची चर्चा ऐरणीवर येते. इतिहासाचे वस्तुनिष्ठ लेखन करण्यासाठी इतिहासकाराला निकड भासते ती अस्सल, विश्वसनीय अशा आधारसाहित्याची. अशी आधारसाहित्याची सामग्री अक्षरशः बहुविध असल्याने उपलब्ध होणा-या पुराव्यांचे काटेकोरपणे परीक्षण करणे इतिहासकाराला भाग पडते.

## इतिहासातील सत्यशोधन आणि सत्याचे प्रकार

उपलब्ध होणा-या पुराव्याचे परीक्षण करण्याचेही पुन्हा दोन प्रकार आहेत. संशोधनपद्धतीशास्त्रात या परीक्षणाचे 'अंतरंग परीक्षण' आणि 'बहिरंग परीक्षण' असे दोन प्रकार सांगितलेले आहेत. इतिहासातील तथ्यशोधनासाठी इतिहासकाराने शक्यतो कोणताही पुरावा वर्ज्य मानू नये. मात्र, तथ्य प्रस्थापित करण्यासाठी वापरावयाचे आधारसाहित्य निवडतेवेळी इतिहासकाराने साधनशुचितेचे भान बाळगणे आवश्यक असते. भूतकाळातील घटनांसंदर्भातील माहिती व संदर्भसाहित्याचे अक्षरशः भांडार आजघडीला इतिहासकारांना उपलब्ध होते आहे. त्यामुळे, साधनशुचितेचा पैलू इथून पुढच्या काळात अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. इतिहासलेखनासाठी ज्या प्रमाणे नवनवीन साधनसामग्री आता इतिहासकारांना उपलब्ध होते आहे त्याचप्रमाणे काही पूर्वापार साधने आता विसर्जनही पावत आहेत. इतिहासकालीन विख्यात व्यक्तिमत्त्वांचा खासगी पत्रव्यवहार हा इतिहासलेखनाचा एक अतिशय भरवशाचा साधनस्त्रोत समजला जातो. मात्र, 'ई-मेल'सारखी साधने आता सगळ्यांच्याच हाताशी सर्रास असल्याने येत्या काळातील इतिहासलेखकांना साधनसामग्रीच्या या एका महत्त्वाच्या स्त्रोताला मुकावे लागणार आहे. त्यामुळे, नवनवीन आधारसाहित्याचे शोधन सतत चालू ठेवणे इतिहासलेखकांना क्रमप्राप्त ठरते.

ऐतिहासिक संशोधन ही ख-यातील खरे शोधण्याची प्रक्रिया असते. भूतकाळात घडून गेलेला घटनाक्रम पुराव्यासहित मांडणे, सत्य शाबित करणे हे इतिहासलेखकाचे अंगीकृत कार्य ठरते. इथे आणखी एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो. एखाद्या ऐतिहासिक सत्याचा मागोवा घेण्यासाठी इतिहासकार ज्या वेळी आधारसाहित्य धुंडाळत असतो त्या वेळी तो ज्याच्या शोधात असतो त्याच्या जोडीनेच, काळाच्या पोटात गडप झालेल्या अनेक अन्य सत्यांचा शोध त्याला अवचितच लागत असतो. अशा वेळी, समोर उलगडलेल्या सत्यांचा प्राधान्यक्रम इतिहासकाराला लावावा लागतो. पुढ्यात अवतरलेल्या सत्यांची वर्गवारी अशा प्रसंगी अपरिहार्य ठरते. अशा वेळी, मग, ऐतिहासिक सत्य हे निखळ सत्य म्हणता अगर मानता येईल का, हा मोलाचा प्रश्न उद्भवतो. ***(कृपया पृष्ठ २३ पाहावे).***



*(पृष्ठ ८ वरून)*

अन्य देशांमधील 'रोमानी' नागरिकांची स्थिती फारशी वेगळी नाही. मात्र, ब्रिटनमधील 'रोमानी' नागरिकांची स्थिती तुलनेने बरीच चांगली असल्याचे एका अभ्यासात म्हटले आहे. अलीकडच्या काळात 'रोमानी' नागरिक अन्य युरोपीय देशांमध्ये विखुरले असल्याने 'रोमानी' नागरिकांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी विविध देशांमध्ये धोरणे आखली जावीत, असे अभ्यासकांनी सुचवले आहे. 'रोमानीं'ना मोफत शिक्षण आणि किमान काही रोजगार मिळण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये शिकवण्यावर भर देण्यात यावा, असे प्रतिपादन करण्यात आले आहे. आता 'युरोपीय युनियन'च्या 'राष्ट्रीय एकात्मता धोरणां'नुसार 'रोमानी' नागरिकांच्या सर्वंकष विकासाला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. 'चरैवेति चरैवेति' असे म्हणत मार्गक्रमण केलेल्या आणि कालांतराने युरोपीय देशांत स्थिरावलेल्या या भटक्या आणि आनंदी वृत्तीच्या 'जिप्सीं'ना युरोपीय समुदायाने आपले मानून उशीरा का होईना पण विकासाची संधी देऊ केली आहे. या संधीचा त्यांना लाभ होईल व त्यांचे जीवन 'रुमानी' बनेल अशी आशा आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

*(पृष्ठ क्रमांक २१ वरून)*

इतिहासकाराच्या पुढ्यात उलगडणा-या नाना प्रकारच्या सत्यांची जंत्री मांडायला आपण बसलो तर इतिहासातील निखळ सत्यशोधन ही किती क्लिष्ट बाब असते याचे काहीसे भान आपल्याला येईल. त्याचसाठी, या सत्यांची काही प्रमुख रूपे न्याहाळून पाहणे इष्ट ठरते. वस्तुनिष्ठतेचा पैलू आणि इतिहासकाराने वस्तुनिष्ठपणे इतिहासलेखन करावे ही त्याच्याकडून असलेली अपेक्षा यांच्या विचाराला इथे मग बहुविध आयाम लाभत जातात.

**इतिहासातील बहुविध सत्ये आणि सत्यशोधन**

इतिहासकाराला दखल घेणे भाग पाडणा-या काही सत्यप्रकारांचा निर्देश पुढीलप्रमाणे करता येईलः वस्तुनिष्ठतेच्या पैलूचा विचार या प्रत्येक सत्यप्रकारात निरनिराळ्या पद्धतीने करावा लागतो.

(१) **स्वतःसिद्ध अथवा साक्षात सत्यः** ज्या सत्याच्या पडताळणीसाठी कोणत्याही बाह्य पुराव्याची फारशी जरूरच भासत नाही, अशा सत्यांचा समावेश या गटात होतो. 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' अथवा, 'हातच्या काकणाला आरसा कशाला...' या प्रकारातील ही सत्ये होत. आता, सत्यांचा हा प्रकार इतिहासाला वा इतिहासलेखनाला लागू होत नाही. किंवा, दुस-या शब्दांत सांगावयाचे तर या गटातील सत्यांना इतिहासाच्या संदर्भात मर्यादा पडतात. मुळात, भूतकाळात घडून गेलेल्या घटितांमधील सत्य इतिहासकार हा वर्तमानात स्थिर होऊन शोधत असतो. म्हणजेच, ती घटना ज्या वेळी घडली त्या वेळी इतिहासलेखक त्या ठिकाणी उपस्थित असण्याचा प्रश्न असंभवच असतो. त्यामुळे, वस्तुनिष्ठतेच्या संदर्भात या प्रकारची भौतिक सत्ये इतिहासलेखनाच्याबाबतीत अप्रस्तुत ठरतात.

(२) **चित्रित सत्यः** आजचे युग तंत्रज्ञानाचे असल्यामुळेच या गटातील सत्ये इतिहासकाराला अवगत होण्याच्या शक्यता हस्तगत झालेल्या आहेत. घटनांचे चित्रीकरण, चित्रफिती, छायाचित्रे... यांसारखे त्या त्या घटनांची वस्तुनिष्ठता सिद्ध करणारे चित्रित पुरावे वा आधार आता इतिहासकारांना उपलब्ध होऊ शकतात. अर्थात, यांमुळेही घटितांची वस्तुनिष्ठता निरपवाद सिद्ध होते अशातला भाग नाही कारण, अशा प्रकारच्या चित्रित पुराव्यांतही भेसळ करता येते.



(३) **परावर्तित सत्यः** भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांना जोडणारा दुवा म्हणूनच इतिहासकार काम करीत असतो. घडून गेलेल्या घटना वर्तमानकालीन समाजमानसासमोर साधार मांडण्याच्या बांधिलकीतून तो इतिहासलेखनाला प्रवृत्त झालेला असतो. त्यामुळे, इतिहासकाराच्या माध्यमातून गतकालीन घटनांचे जे यथार्थ अथवा सत्य रूप-स्वरूप वाचकांसमोर अथवा वर्तमानकालीन समाजपुरुषासमोर उलगडत असते ते, वास्तवात, भूतकालीन घटनेचे (अथवा घटनांचे) त्या इतिहासलेखकाला प्रतीत झालेले रूप असते. या अर्थाने त्या घटनेच्या वस्तुनिष्ठ चित्रणाला अंगभूत मर्यादा असते. इथे इतिहासकार हा मध्यस्थाच्या भूमिकेत असतो. संपूर्ण इतिहासाची उभारणीच या प्रकारे होत असते. त्यामुळे, इतिहास सिद्ध करण्याच्या या प्रक्रियेत इतिहासकाराची एक माध्यम म्हणून जी भूमिका असते तिचा वाण जरी नाही तरी काही अंशी का होईना पण गुण तरी इतिहासकथन-लेखनाला लागण्याची शक्यता वगळून चालत नाही. त्या प्रमाणात इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेबाबत काही एक तडजोड केवळ अपरिहार्यच नव्हे तर अनिवार्यही ठरते.

(४) **शेष सत्य अथवा स्मृतिरूप सत्यः** वस्तुनिष्ठ इतिहासलेखनासाठी ज्या वेळी विश्वसनीय, अधिकृत लिखित पुरावे वा साधनसामग्री इतिहासकारापाशी सिद्ध होऊ शकत नाही त्यांवेळी त्या त्या घटनांच्या वेळी तिथे हजर असलेल्यांच्या त्या त्या घटनांसंदर्भातील आठवणी, मौखिक इतिहास, मुलाखती... यांसारख्या साधनांचा आधार इतिहासकाराला घेणे भाग पडते. या प्रकारात, इतिहासकाराला लाभत असते ते स्मृतिरूप अथवा शेष सत्य. म्हणजेच, इतिहास कथन करणा-या व्यक्तीच्या स्मरणातून झिरपून त्या घटनाक्रमाचे जे अवशेष त्याच्या मुखावाटे उमटत असतात त्या अवशेषांचा वापर इतिहासकार आधारसाहित्य म्हणून वापरत असतो. इथे वस्तुनिष्ठतेचा संकोच काही अंशी होतच असतो. कारण, अखेर स्मृतिगत आठवणींमध्ये काही विसंगती, विस्मरण-स्मरणाचा खेळ, घटनांचा क्रम कथन करण्यात वयानुसार विस्कळीत बनणारी कालानुक्रमी यांसारखे धोके संभवतात याची शक्यता इतिहासकाराला गृहीत धरावीच लागते. विश्वासार्ह अशा लिखित पुराव्यांच्या प्रकाशात ती अवशिष्ट सत्ये मग जोखावी लागतात.

**(५) अर्धसत्य अथवा अर्धवट सत्यः** सत्याचा हा प्रकार निखळ परिस्थितीजन्यच म्हणावा लागतो. ऐतिहासिक घटनांत दडलेले सत्य वा वास्तव वस्तुनिष्ठपणे मांडण्यास आवश्यक असणारे पुरावे, विश्वसनीय आधारसाहित्याची कमतरता, उपलब्ध होणा-या साधनांच्या मर्यादा यांपायी भूतकाळात गडप झालेले पूर्ण वास्तव इतिहासकारासमोर उलगडले जात नाही. जो काही पुरावा त्याच्या हाती येतो त्यांद्वारे त्या वास्तवाचे काही कवडसे त्याला गवसतात. त्या कवडशांची जोडणी, जुळणी करूनच त्याला इतिहासाचे वस्त्र विणावे लागते. साहजिकच, त्या इतिहासवस्त्राचे रूप हे एखाद्या गोधडीसारखे असते. त्यामुळे, अशा त्या जोडणीद्वारे कामचलाऊ सत्याचे काही एक शिल्प वाचकांसमोर उभे राहत असते.

**(६) आभासी सत्यः** आजच्या युगाचे वर्णन अनेक अभ्यासक 'उत्तराधुनिकतेचा काळ' अशा शब्दांत आताशा करत असतात. सध्याचे युग हे संगणकांचे आहे. हे तंत्रज्ञान आजघडीला इतके प्रगत झालेले दिसते की त्याच्या आधारे कोणत्याही प्रकारचे आभासी सत्य (व्हर्च्युअल रिॲलिटी) निर्माण करणे आता सहजशक्य बनलेले आहे. एका पातळीवर, त्यामुळे, इतिहासलेखनाच्या संपूर्ण अस्तित्त्वालाच जणू एक प्रगाढ आव्हान उभे ठाकू पाहते आहे. आभासी सत्याच्या निर्मितीची शक्यता आता वास्तवाच्या कक्षेत आलेली असल्याने 'वास्तव, भौतिक सत्य' सापडल्याचा दावा करणे कोणाही इतिहासकाराला इथून पुढच्या काळात अतिशय दुष्कर बनण्याची चिन्हे दिसतात. कारण, सत्याच्या या दोन प्रकारांतील सीमारेषाच आता अस्तंगत होत आहेत. त्यातच, सध्याचे एकंदरच वास्तव इतके व्यामिश्र बनलेले आहे की, सत्य सापडल्याचा दावा करणेही अत्यंत दुरापास्त ठरत जाणार आहे. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर, वस्तुनिष्ठतेचा प्रश्न, पैलू आणि दावा अधिकच अवघड बनत जातो आहे.

इतिहासाच्या लेखनातील वस्तुनिष्ठतेबाबत अथवा वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाबाबतच्या सध्याच्या चर्चेची व्यापक आणि तितकीच गुंतागुंतीची पार्श्वभूमी ही अशी आहे. व्यामिश्र वर्तमानाचेच आकलन इतके दुष्कर बनते आहे की भूतकाळाचे आकलन वस्तुनिष्ठ असल्याचा दावा कशाच्या आधारे करावा असा एक मूलभूत प्रश्न आताशा उपस्थित केला जाताना दिसतो.



अर्थात, ही भूमिकाही आजकालची आहे अशातला भाग नाही. मुळात, इतिहासलेखन आणि इतिहासाचे वाचन या अनुक्रमे इतिहासलेखक आणि इतिहासवाचकसापेक्ष बाबी असतात. आधारसाहित्याची निवड, पुराव्यांचे परिशीलन, विश्लेषण व अन्वय इतिहासलेखक करीत असतो. दुसरीकडे, वाचकही काही मनाची पाटी अगदी कोरी ठेवून इतिहासाचे वाचन करत नसतो. त्यामुळे, इतिहासाचे लेखन आणि वाचन हे दोन्हीही स्वरूपतःच विलक्षण व्यक्तिसापेक्ष असल्याने इतिहासाबाबत वस्तुनिष्ठतेचा अतिवादी आग्रह अथवा दावा कोणी धरूनये, हा पूर्वपक्ष पूर्वापार मांडला गेलेला आहे. इतिहासकाराला दिसलेले, गवसलेले सत्य मुदलात अंतिम सत्य नसतेच तर ते त्याला प्रतीत झालेले सत्य असल्याने वस्तुनिष्ठतेचा अवाजवी आग्रह धरण्यात काय हशील, असाही एक पैलू या सगळ्या चर्चेला आहे. विल् ड्युरांट यांच्यासारखा विख्यात इतिहासकार आणि विचारवंत तर सगळे इतिहासलेखन म्हणजे एक कयास असतो, अशी भूमिका घेताना दिसतो. परंतु, या ठिकाणी एक दुरुस्ती मात्र करून घ्यावी लागते. ऐतिहासिक वास्तव हे अखेर इतिहासकाराला प्रतीत होणारे शक्य असले तरी ती प्रतीती साधार असते, हे विसरून चालत नाही.

या भूमिकेच्या दुस-या टोकावर उभा आहे तो रान्ते संप्रदाय. इतिहासलेखनाची बैठक आणि शिस्त ही शास्त्रीयच असली पाहिजे, हे या संप्रदायाचे मुख्य प्रतिपादन. साधार, विश्वसनीय, अधिकृत पुराव्याखेरीज, निरपवाद अशा आधारसाहित्याचा संभार हाताशी असल्याखेरीज इतिहास सिद्ध करणे अशक्यच आहे, या मतावर रान्ते संप्रदाय ठाम आहे. या भूमिकेबाबत दुमत नसले तरी इथे मग काही अतिशय मूलभूत स्वरूपाचे पद्धतीशास्त्रीय प्रश्न उपस्थित होतात. ज्या देशांतील काही समाजसमूहांत प्रदीर्घ काळ प्रगाढ निरक्षरता नांदत आलेली असते अशा देशांचा व त्यांतील संबंधित समाजसमूहांचा साधार इतिहास मग लिहिताच येणार नाही. कारण, निरक्षरतेचे दान पदरी घातल्या गेलेल्या, एकंदरच समाजव्यवस्थेमध्ये दडपल्या गेलेल्या समाजसमूहांचा इतिहास लिखित अशा दस्तऐवजांच्या साहाय्याने सिद्ध करणे, ही अशक्यप्राय बाब होऊन बसते. दडपल्या गेलेल्या समाजसमूहांच्या इतिहासाची साधनेही दडपली गेलेली असतात.

**वस्तुनिष्ठता आणि सामाजिक शास्त्रेः**

'वस्तुनिष्ठता' या संकल्पना अथवा शब्दाच्या कोशगत अर्थाकडे या ठिकाणी आपल्याला वळावे लागते. एखाद्या घटनेच्या वस्तुनिष्ठ नोंदीसाठी अथवा निरीक्षणासाठी ती घटना निरीक्षणयोग्य, प्रयोगयोग्य, अनुभवयोग्य असणे आवश्यक ठरते. तपशीलनिष्ठतेचा आग्रह अशा वेळी धरता येतो. भूतकालीन घटनांची नोंद करताना इतिहासकाराने वस्तुनिष्ठतेचा वसा जपला पाहिजे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा, इतिहासलेखकाचे व्यक्तिगत मत, त्याचे पूर्वग्रह, समजुती, धारणा, भूमिका, लहर, आकस यांसारख्या बाबींना इतिहासलेखनात थारा असता कामा नये असे आपल्याला अपेक्षित असते. इतिहास शब्दबद्ध करीत असताना इतिहासकाराने निरीक्षण, अभ्यास, पडताळणी आणि मग निष्कर्ष याच पद्धतीचा अवलंब करावा हे वस्तुनिष्ठतेच्या मूल्याशी सुसंगत ठरते. नेमकेपणा, तटस्थपणा, अचुकता, शास्त्रीयता हे सगळे वस्तुनिष्ठतेचे अंगभूत पैलू ठरतात. या पैलूंशी इमान राखूनच इतिहासकाराने इतिहासलेखन करावे, ही इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेची मागणी असते.

'इतिहास' ही ज्ञानशाखा सामाजिक शास्त्रांच्या व्यापक गटात गणली जाते. इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेच्या मुद्याचा विचार करीत असताना हे वास्तव आपल्याला नजरेआड करून चालत नाही. सामाजिक शास्त्रांचा अभ्यासक हा समाजाचा म्हणजेच पर्यायाने सामुदायिक मानवी मनाचा, मानवी समूहाच्या वर्तनाचा अभ्यास करत असतो. गंमत म्हणजे, तो अभ्यासक हाही त्याच समाजाचा एक जैविक घटक असतो. म्हणजे, या ठिकाणी निरीक्ष्य आणि निरीक्षक हे एकाच सजीव वास्तवाचे दोन घटक असतात. या वातावरणात वस्तुनिष्ठतेच्या पैलूला एक अतिशय स्वाभाविक आणि नैसर्गिक मर्यादाच पडलेली असते. मनुष्य, मनुष्यसमाज हे सतत परिवर्तनशील असलेले वास्तव होय. अशा परिस्थितीत, सामाजिक शास्त्रांच्या प्रांगणात वस्तुनिष्ठता कोठवर, कशी पाळायची हा एकंदरच पद्धतीशास्त्रीय असा तात्त्विक पेच आहे. ही गुंतागुंत ध्यानात घेऊनच लॉर्ड ॲक्टनसारखा इतिहासलेखक आणि अभ्यासक-संशोधक 'वस्तुनिष्ठ सत्य अस्तित्त्वात नसतेच', अशी भूमिका स्पष्टच करून टाकतो.



सर्व इतिहास आणि इतिहासलेखन हा स्वरूपतः इतिहासकाराचा अनुभव असतो, हे या सगळ्या चर्चेचे सार ठरते. अशा परिस्थितीत, इतिहास लेखन करीत राहणे हाच इतिहास सिद्ध करण्याचा एक मार्ग उरतो. इतिहास म्हणजे घडून गेलेल्या घटनांची केवळ जंत्री नव्हे तर, इतिहास म्हणजे घटितांचा अन्वयार्थ हे तत्त्व म्हणा वा व्याख्या म्हणा आपण जर का मानली तर वस्तुनिष्ठतेच्या पैलूबाबतचे एक प्रगल्भ तारतम्य आपल्या अंगी बाणत जाते. या संदर्भात, मग, जॉर्ज क्लार्क आणि ई. एच. कार या दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची मते लक्षणीय ठरतात. इतिहासाच्या लेखनामध्ये सत्य हा गाभा असला तरी तो अन्वयांनी वेष्टित असतो, अशी क्लार्क यांची भूमिका. तर, इतिहासलेखनात भूतकालीन घटनांचा अन्वय हा गाभास्थानी असतो आणि वादग्रस्त घटिते त्या गाभ्याला परिवेष्टून असतात, असे प्रतिपादन प्रा. कार करतात. भूत-भविष्य-वर्तमान यांच्या अखंडतेचे सम्यक् भान इतिहासकाराला असणे, घटनांच्या प्रवाहातील द्वंद्वात्मकता जाणण्याची क्षमता जोपासणे आणि विरोधविकासाच्या प्रक्रियेतून साकारणा-या घटनाक्रमांची जाण इतिहासकाराच्या ठायी प्रगल्भपणे विकसित होणे... या सगळ्याचे एकात्म रूप म्हणजे इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठता अशी 'वस्तुनिष्ठता' या जटिल संकल्पनेची व्याख्या प्रा. कार मांडतात. आधारसाहित्याच्या टेकूवर इतिहासलेखनाची इमारत इतिहासकाराला उठवणे भाग असले तरी, इतिहाससाधनांची अंधभक्ती इतिहासलेखकाने करूनये, असे प्रा. कार यांचे परखड प्रतिपादन. सगळा इतिहास हा अखेर इतिहासकाराचा प्रत्यय असल्याने त्याने लिहिलेला इतिहास वाचण्यापूर्वी इतिहासकार आणि तो इतिहासकार ज्या समाजाचा भाग असतो तो समाज प्रथम वाचावा, असा प्रा. कार यांचा सांगावा होय.

ज्याला आपण वस्तुनिष्ठ सत्य असे म्हणतो-संबोधतो ते सत्य अखेर सापेक्षतेचे वस्त्र ल्यालेले सत्य असते. त्यामुळे, ऐतिहासिक तथ्ये ही निखळ तथ्ये नसतात तर त्यांत मूल्यप्रवेश हा झालेला असतो. तथ्ये आणि मूल्ये या दोहोंवर ऐतिहासिक सत्याची पक्की मांड असते. अखेर, सर्व इतिहास हा व्यक्तिनिष्ठ असतात. काही इतिहास कमी व्यक्तिनिष्ठ असतात आणि म्हणूनच अन्य इतिहासांपेक्षा ते अधिक वस्तुनिष्ठ असतात ! ■■

पुस्तकातून

# शिक्षणापेक्षा शीलाला अधिक महत्त्व द्या...

तारीख १२ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे मुंबई इलाखा अस्पृश्य युवक परिषद आयोजित करण्यात आली होती. तिच्या अध्यक्षस्थानी होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. पुढ्यात बसलेल्या युवकांना मार्गदर्शन करताना बाबासाहेबांनी व्यक्त केलेले विचार जितके प्रगल्भ तितकेच विलक्षण भावगर्भ आणि हृदयस्पर्शी आहेत. विवेचनाच्या भरात बाबासाहेब कधी आठवणींमध्ये रमून गेलेले दिसतात तर, कधी ते त्यांच्या विद्यार्थीदशेतील प्रसंगांच्या स्मरणरंजनात हरखून जातात. भवतालच्या परिस्थितीबाबत मार्मिक टीकाटिप्पण्णी करत असतानाच, औपचारिक शिक्षणाला निखळ व विशुद्ध शीलाची जोड पुरविण्याची जी कळकळ बाबासाहेब व्यक्त करतात ती कमालीची संवेदनशील आणि बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा सारभूत गाभा उलगडून मांडणारी आहे. युवकांशी संवाद साधतेवेळी बरोबर ७५ वर्षांपूर्वी बाबासाहेबांनी व्यक्त केलेले विचार 'जगातील सर्वांत तरूण लोकशाही', असा लौकिक असलेल्या आपल्या देशात आजही तितकेच प्रस्तुत असल्याचे जाणवते. तरुणांशी बोलताना बाबासाहेब म्हणतातः

*"आजची ही युवक परिषद अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वसाधारण लोकसंख्येत मोठा भाग तरुणांचा आहे.... मनुष्याने आपल्या आयुष्यात खाणे, पिणे व जगणे ही आयुष्यातील इतिकर्तव्यता मानता कामा नये. खाणे-पिणे हे जगण्याकरिता असावे व जगणे हे मानमरातबाचे व समाजास भूषणभूत होण्यासाठी समाजसेवेचे असावे. 'खाण्याला काळ व भुईला भार', असे जगणे असले काय नि नसले काय सारखेच.... तरुणांनी नेहमी आपल्यापुढे उदात्त ध्येय ठेवले पाहिजे. तरुणांनी एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की कोणतीही चांगली गोष्ट संपादन करण्यासाठी तप करावे लागते. म्हणूनच आपल्यात एक म्हण रुढ आहे की 'तपा अंती फळ'. कार्य आत्मोन्नतीचे असो वा राष्ट्रोन्नतीचे असो कशाचेही का असेना त्यासाठी सतत प्रयत्न करावयास हवे आहेत. माणसाने त्या कार्यास*



*स्वतःस वाहून घेतले पाहिजे.... कोणीही इसम आपल्या उपजत बुद्धीवर पराक्रम करू शकत नाही. जगात खुळी माणसे फारच थोडी निपजतात तसेच बुद्धीचा विकास करणे ही दरेकाच्या हातची गोष्ट आहे.... ज्या कोणास आपल्या बुद्धीचा प्रभाव वाढवावयाचा आहे त्यांनी तप केले पाहिजे. श्रम केले पाहिजेत. मनुष्य संकटात अगर दारिद्र्यात सापडला म्हणजे तो निराश होत असतो. आपणास यश मिळणार नाही अशी भावना त्याच्या मनात उत्पन्न होते. जर का या भावनेने मनुष्यास घेरले म्हणजे तो मनुष्य आयुष्यात कुचकामाचा ठरतो. हरेक तरुणाने आशा कधीच सोडू नये. ज्या दिवशी तो आशा सोडील त्या दिवशीच तो जगात जगला काय आणि मेला काय सारखाच होईल. हरेक तरुणात महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. महत्त्वाकांक्षेशिवाय मनुष्य धडपड व प्रयत्न करूच शकत नाही... आपल्यापैकी दरेकाने उच्च महत्त्वाकांक्षा बाळगून ती फलद्रुप करण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.... तरुण बंधुंनी आत एक बाहेर एक असली सवय लागू देऊ नये. सत्य सोडू नका. सत्याचा तात्कालिक जरी विजय होत नसला तरी शेवटी सत्याचाच विजय होतो. आपल्यात दुटप्पीपणा असता कामा नये. जगाला जर हा मनुष्य दुतोंडी आहे असे दिसले तर मग जग आपल्यावर विश्वास ठेवणार नाही.... आपल्यापैकी दरेकाने सुविद्य व्हावे अशी माझी फार इच्छा आहे. परंतु त्याच बरोबर आज विद्येची मला मोठी भीती वाटते.... कारण शिक्षण ही तलवार आहे, शिक्षण हे शस्त्र आहे... विद्येचे शस्त्र हे नेहमी वापरणा-यावर अवलंबून असते.... शिक्षण घेतलेल्या माणसाच्या अंगी शील व सौजन्य नसेल तर तो हिंस्त्र पशुपेक्षाही क्रूर व भीतीप्रद समजण्यात यावा. अज्ञ जनतेस छक्केपंजे, डावपेच करता येत नाहीत. शिकल्या सवरलेल्यांना ते अवगत असतात.... दीनदुबळ्या गरीब शेतक-यांना शिक्षण नाही. त्यांच्या अज्ञानीपणाचा फायदा शिकले सवरलेले शेठजी, भटजी, वकील वगैरे सर्व लोक घेत आहेत. अशा त-हेने गरीब जनतेस नाडण्याकडेच जर या शिक्षणाचा उपयोग होणार असेल तर धिःकार असो अशा या शिक्षणाला. त्या दृष्टीने पाहता शिक्षणापेक्षा शील फार महत्त्वाचे आहे... तेव्हा मला तुम्हाला एवढेच सांगावेसे वाटते की, शिक्षणापेक्षा शीलाला अधिक महत्त्व द्या".*

# *चिंपांझींचे जीवन ते वनांचे रक्षण*

पर्यावरणाच्या रक्षणाची, तापमानवाढीची चर्चा चालू होण्याआधीचा तो काळ होता १९६०च्या दशकाचा. जंगलांचे, जंगलांतील प्राणीजीवनाचे आकर्षण असणारी जेन गुडाल (Jane Goodall) ही तरु णी आपल्या परिचिताच्या निमंत्रणावरू न ब्रिटनमधून थेट केनियात पोहचली होती. ‘टारझन’ आणि ‘डॉ. डूलिटल’ या बालपणी वाचलेल्या कथामालांमुळे आपणही जंगलात जाऊन राहावे, अशी इच्छा तिच्या मनात लहानपणापासूनच होती. मग केनियातील या भेटीची संधी तिने दवडली नाही. खरे तर तेव्हा जेनच्या मातापित्यांचा घटस्फोट झाला होता आणि तिला परदेशी पाठवण्यासाठी जेनच्या आईकडे पैसे नव्हते. जेनचे शालेय शिक्षण तेव्हा पूर्ण झाले होते. मग जेनने नोकरी करू न तिकिटाचे पैसे जमवले आणि ती केनियात पोहचली. अर्थातच, एका सदिच्छा भेटीमुळे आपल्या जीवनाला दिशा मिळणार आहे हे तिच्या ध्यानीमनीही नव्हते. या भेटीत तिचा परिचय योगायोगाने मानववंशसंशोधक व पुरातत्वसंशोधक Dr. Louis Leakey यांच्याशी झाला. त्या वेळी Dr. Leakey हे संशोधक-मदतनीसाच्या शोधात



होते. कारण, मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करताना मानवाचे पूर्वज समजल्या जाणा-या माकडांमधील चिंपांझींच्या वर्तनाचाही सखोल अभ्यास व्हायला हवा, हे त्यांना प्रकर्षाने जाणवत होते. प्राण्यांबाबतचे कुतूहल व आकर्षण असणा-या जेनला त्यांनी ही संधी दिली. गंमत म्हणजे जेनने विद्यापीठीय शिक्षणाची सुरुवातही केलेली नव्हती. पण पदवीच्या औपचारिकतेपेक्षा जेनचे कुतूहल आणि वन्य जीवनाबाबत तिला असणारे आकर्षण हे Dr. Leakey यांना अधिक महत्त्वाचे वाटले होते.



तिच्या निवडीनंतर Dr. Leakey संशोधनासाठी निधी मिळवण्याच्या कामात व्यस्त झाले होते. जंगलात वास्तव्य करण्याचे जेनचे स्वप्न आता अगदी सहजपणे साकारले होते आणि औपचारिक शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना Dr. Leakey यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवून दाखवण्याची जबाबदारी जेनवर होती. पूर्व आफ्रिकेतील टांझानिया (तत्कालीन Tanganyika नंतर Tanzania) येथील चिंपाझींची माहिती जमवण्याची जबाबदारी तिच्याकडे सोपविण्यात आली होती. तेव्हा त्या भागात ब्रिटिशांचा अंमल होता. पण आफ्रिकेतील जंगलात एका तरु णीने एकटे जाण्याची कल्पनाच कुणी ऐकलेली नव्हती. त्यामुळे जेनबरोबर तिची आईदेखील तेथील Gombe जंगलात पोहचली.

चिंपांझींना न्याहाळणे व त्यांच्या बारिकसारीक हालचालींचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी ठेवणे, छायाचित्रे घेणे सोपे नव्हते. पण प्राण्यांचा अभ्यास हेच तिचे ध्येय होते. त्यासाठी जेनची चिकाटी जबरदस्त होती. जेनच्या बालपणाची एक गोष्ट या संदर्भात बोलकी ठरावी. जेन पाच वर्षांची होती तेव्हा कोंबडी अंड कसे देते ते पाहण्यासाठी, कोंबड्यांच्या खुराड्यात ती पाच तास एकटी थांबली होती.



तिला शोधून दमलेल्या पालकांनी तर ती हरवल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. पण नंतर तिच्या आईने घडलेला प्रकार समजून घेतला आणि तिला न रागवता आपली आवड पूर्ण करण्यासाठी मेहनत करण्याचा सल्ला दिला. आफ्रिकेतील घनदाट जंगलात भटकणे, चिंपांझींच्या मागावर राहणे आणि त्यांच्या नकळत त्यांचे निरीक्षण करणे ही अवघड बाब होती. माणूस आपल्या जवळ येऊ लागल्याची चाहूल लागताच चिंपांझी पळ काढायचे. त्यांना दुर्बिणीतून न्याहाळणे हेच किती तरी दिवस जेनचे काम बनले होते. जेनच्या अभ्यासातील विशेष बाब म्हणजे चिंपांझींना संशोधक देतात तसे क्रमांक न देता त्यांची माणसांसारखी नावे तिने ठेवली होती.

जेनच्या निरीक्षणातून चिंपांझींबाबत अनेकानेक बाबी प्रथमच पुढे आल्या. चिंपाझी दगडी हत्यारांचा वापर करतात, सभोवताली उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा वापर करून काही हत्यारे तयार करण्याचा प्रयत्न करतात असे दिसून आले. फक्त माणसेच हत्यारे तयार करू शकतात, असे तोपर्यंत समजले जात होते. मात्र, चिंपांझींबाबतचा अभ्यास पुढे आल्यानंतर Dr. Leakey यांनी, 'हत्यारे म्हणजे काय, माणूस म्हणजे कोण या व्याख्या



तरी बदलल्या पाहिजेत किंवा चिंपांझींना तरी माणूस म्हटले पाहिजे,' असे खळबळजनक व धाडसी विधान केले होते. तसेच, चिंपांझी फक्त शाकाहारी असतात हा समजही चुकीचा असल्याचे जेनच्या निरीक्षणातून दिसून आले. मेलेल्या प्राण्याचे मांस चिंपांझी खातात व आपल्या पिलांनाही ते खाण्यास देतात असे तिला आढळले. या नंतर 'नॅशनल जिऑग्राफिक' या जगप्रसिद्ध मासिकाने या विषयाची दखल घेतली. जेनच्या मुलाखती घेतल्या गेल्या. हा विषय महत्त्वाचा असून त्यात अधिक सखोल अभ्यास केला पाहिजे, असे लक्षात आल्यानंतर जेनने केंब्रिज विद्यापीठात पीएच.डीसाठी नाव नोंदवले. विद्यापीठीय शिक्षण झालेले नसतानाही पीएच.डीसाठी नाव नोंदवले जाण्याची घटना अपवादात्मकच गणली जाते. जेनबाबत असा अपवाद घडला होता. स्वाभाविकच, विद्यापीठीय वर्तुळात जेनचे स्वागत झाले नाही. प्राण्यांना क्रमांक देण्याची पद्धत तिने मोडली म्हणून तिच्यावर टीकाही झाली. पण जेनने नेटाने अभ्यास पूर्ण केला. प्राण्यांच्या वर्तनावर (ethology) तिला १९६६मध्ये डॉक्टरेट मिळाली. दरम्यान, तिच्या अभ्यासाचे चित्रण करणा-या फोटोग्राफर ह्युगोशी ती विवाहबद्ध झाली आणि त्यांनी Gombe Stream Research Centre स्थापन केले. या केंद्रातील अभ्यास जसजसा पुढे जाऊ लागला तसतशी चिंपांझींच्या वर्तनाबाबतची नवीन माहिती पुढे येऊ लागली आणि जेनचे नाव जगभरात प्रसिद्ध होऊ लागले.



चिंपांझींचे वर्तन आणि माणसांचे वर्तन यांत ब-याच प्रमाणात साधर्म्य आढळते. राग, लोभ, प्रेम, माया, मत्सर या सर्व मानवी मानल्या जाणा-या भावना चिंपांझींमध्ये असतात. अनाथ पिलांचा सांभाळ ते मायेने करतात. तर कधी दोन गटांमध्ये भांडणे झाल्यास एकमेकांचा जीव घेण्यासही कमी करत नाहीत. हसणे-खिदळणे, गंमती करणे, मनोरंजनासाठी काहीतरी वेगळे करून पाहणे अशा अनेक गोष्टी चिंपांझी करत असतात. सहकार्याची प्रेरणाही चिंपांझींमध्ये असते. या सर्व अभ्यासांवर जेन यांनी पुस्तकेही लिहिली. *In the Shadow of Man, Through a Window* ही त्यांची पुस्तके गाजली. पण सर्वांत महत्त्वाचा व अभ्यासकांच्या वर्तुळात चर्चिला जाणारा त्यांचा ग्रंथ १९८०च्या दशकाच्या मध्यास प्रसिद्ध झाला. *Chimpanzees of Gombe: Patterns of Behaviour* हा तो ग्रंथ होय. १९६० ते १९८० या वीस वर्षांत जेन यांचे काम बरेच पुढे गेले आणि त्यांच्या कौटुंबिक जीवनातही चढउतार झाले. ह्युगोचे छायाचित्रणाचे करियर आणि जेनचे करियर यात त्या दोघांची मानसिक ओढाताण झाली. अखेरीस त्यांचा घटस्फोट झाला. त्या नंतर टांझानिया राष्ट्रीय उद्यानाच्या प्रमुखांशी जेन यांचा पुढे विवाह झाला पण या दुस-या पतीस कर्करोगाने गाठले आणि त्यांच्या मृत्यूनंतर Gombe Stream Research Centre ची सर्व जबाबदारी जेन यांच्यावर पडली.

या सर्व काळात जेन यांचा अनेक अभ्यासपरिषदांमध्ये सहभाग राहिला. १९८०च्या दशकात शिकागो येथे झालेल्या एका परिषदेदरम्यान त्यांच्या असे लक्षात आले की, (चिंपांझींचे वास्तव्य असलेल्या) अनेक देशांमध्ये विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जंगलांचा, वनसंपत्तीचा -हास मोठ्या प्रमाणावर होतो आहे. त्यामुळे चिंपाझींची संख्या घटू लागली आहे.



मानवाच्या उत्क्रांतीचा साक्षीदार व सहचर असलेल्या चिंपाझींना वाचवायचे असेल तर जंगलांचे रक्षण केले पाहिजे, हे त्यांना जाणवले. त्यामुळे त्यांनी आपल्या कार्याची दिशा बदलली. आता (चिंपाझींचे व) वनांचे रक्षण हा त्यांच्या कामाचा प्रमुख भाग बनला.

या नंतर १९९०च्या दशकात पर्यावरणाचा प्रश्न पुढे येऊ लागला आणि 'जंगले वाचवा, पर्यावरण टिकवा,' असे सातत्याने म्हटले जाऊ लागले होते. तसेच, वनसंपत्तीवर अवलंबून असणा-या नागरिकांचे प्रश्नही मांडले जात होते. या सर्व बाबींचा विचार करून जेन यांनी १९९७मध्ये Jane Goodall Institute स्थापन केली. वन्यप्राणी, वनसंपत्ती यांचे रक्षण-संवर्धन, देशोदेशांतील नागरिकांचे त्यासाठी प्रबोधन, युवावर्गाचा सहभाग, वनसंपत्तीवर अवलंबून असणा-या नागरिकांचे सक्षमीकरण अशी अनेक उद्दिष्टे संस्थेने स्वतःसमोर ठेवली. निसर्ग, प्राणी व मानव यांच्यातील परस्परसंबंध व अवलंबित्व लक्षात घेऊन वनांचे रक्षण करण्यास नागरिकांनी प्रेरित व्हावे याकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. जेन यांनी या कार्याच्या माध्यमातून या संस्थेशी सुमारे दीडशे देशांमधील नागरिकांचे नाते जोडले. देशोदेशींच्या युवावर्गाला सहभागी करून घेण्यासाठी Roots and Shoots असा उपक्रम हाती घेण्यात आला. तर, आफ्रिकेतील जंगलांचे रक्षण करण्यासाठी 'आफ्रिका प्रोग्राम'अंतर्गत काही योजना आखण्यात आल्या. या संस्थेच्या व जेन यांच्या कार्याची दखल संयुक्त राष्ट्रसंघानेही घेतली. २००२ मध्ये राष्ट्रसंघाच्या 'शांततेच्या दूत' म्हणून त्यांची निवड करण्यात आली. 'जागतिक शांततेसाठी सर्व देशांनी परस्परांमधील संघर्षाला तर पूर्णविराम दिलाच पाहिजे व त्याचबरोबर निसर्गाचा विनाशही रोखला पाहिजे,' हा राष्ट्रसंघाचा संदेश जेन यांनी जगभरात पोहचवला आहे. या कामातून सवड काढून वर्षातून दोनदा तरी त्या Gombe संशोधन केंद्राला भेट देत असतात. मानवी वर्तनाचे धागेदोरे चिंपांझींमध्ये शोधणा-या अभ्यासकांना आजही Gombe येथे जावेच लागते यावरून त्यांच्या मूलभूत अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित होते. चिंपांझींच्या जीवनापासून सुरू झालेला त्यांचा अभ्यास-प्रवास वनांच्या रक्षणापर्यंत पोहचला आहे. यंदा ऐंशीव्या वर्षी जगभरात फिरतानाही आफ्रिकेतील चिंपांझींना त्या विसरलेल्या नाहीत. केळे खाणारा Mr. H. या नावाचा खेळण्यातील चिंपांझी आजही जेन यांच्याबरोबर जगभर प्रवास करतो आहे. ■■


Mr. H.



## वाचकांच्या माहितीसाठी

### व्यापारी मित्र

अर्थ-उद्योग-व्यापार ही माणसांच्या दैनंदिन व्यवहारात महत्त्वाची असलेली बाब आहे. विविध प्रकारचे कर आणि व्यापारविषयक अन्य माहिती व्यापा-यांना देण्याच्या उद्दिष्टाने १९५० मध्ये **'व्यापारी मित्र'** हे मासिक **संस्थापक संपादक श्री. जी. डी. शर्मा** यांनी चालू केले. त्यांचे सुपुत्र श्री.सोहनलाल व पुरुषोत्तम हे या मासिकाचे सहसंपादक आहेत. व्यापाराशी संबंधित अनेक बाबींची माहिती करून देणारे हे मासिक ख-या अर्थाने व्यापा-यांसाठी 'मित्र' म्हणून भूमिका बजावते. या मासिकाचा अर्थसंकल्प विशेषांकही काढण्यात येतो. एका प्रकारे महाराष्ट्रातील व्यापा-यांमध्ये परस्परसंवाद घडवून आणण्याचे काम या मासिकाने केले आहे. **(वार्षिक वर्गणी ३५० रुपये)**

**पत्ता - संपादकीय व जाहिरात विभाग, ४०९, मंगळवारपेठ, लॉईड्स् चेंबर, ऑफिस नंबर ४०१, चौथा मजला, आंबेडकरभवनजवळ, मालधक्का चौक, पुणे ४११ ०११ दूरध्वनी (०२०) ४१२६७३६०, २६१३७२००**
**ई-मेल -** sampadak@vyaparimitra.com

### सहकार सुगंध

'सहकार' हा मानवी जीवनाचा पाया आहे. सहकारक्षेत्राची पाळेमुळे भारतात चांगलीच रुजलेली आहेत. सहकार क्षेत्रात कार्यरत असणा-या **सहकार भारती** या संस्थेचे मुखपत्र असलेले **'सहकार सुगंध'** हे मासिक आहे. या मासिकाचे यंदा नववे वर्ष आहे. 'बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार' हे सहकार भारतीचे घोषवाक्य असून या मासिकाचे संपादक श्री. भालचंद्र कुळकर्णी हे आहेत.
**(वार्षिक वर्गणी २०० रुपये)**

**पत्ता - सर्व्हे क्रमांक १/२७-२९, माऊली सोसायटी, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, हिंगणे, पुणे ४११ ०५२. दूरध्वनी (०२०) २४३५७७४६**
**कार्यालय मो - ८८०५९८१६७३** (ई-मेल - sahakar.sugandha@gmail.com)

**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines :** (1)The Economist April 6 th -12 th 2013 (2) Current ScienceVol 104 No 8,25 April 2013

**(B) Books/Reports :** (1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणेः खंड १८; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे : भाग -२ : १९३७ ते १९४५, संपादकः सर्वश्री वसंत मून, हरी नरके, प्रा. अशोक गोडघाटे, प्रा. डॉ. म. ल. कासारे आणि एन. जी. कांबळे; डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, २००२, पृष्ठ क्रमांक : ११४ ते ११७.

**(C) Websites :**http://www.janegoodall.org (2) http://blogs.scientificamerican.com (3)www.guaardian.co.uk



**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Windows into a Revolution : Ethnographies of Maoism in India and Nepal, Edited by Alpa Shah and Judith Pettigrew, Orient BlackSwan, Asaf Ali Road, New Delhi, 2012, pp. xiv+337, Price - Rs. 695/-**

माओवादी गटांच्या कारवाया आणि त्या कारवायांबाबत सरकार करीत असलेल्या उपाययोजना या परिस्थितीत संघर्षग्रस्त भागांतील सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अडचणीत सापडते. स्थानिक परिसरातील माओवादी गटापासून दूर जाता येत नाही आणि दैनंदिन व्यवहारांत सरकारी यंत्रणेलाही बाजूला सारता येत नाही, अशा कात्रीत ते अडकले जातात. 'ना इकडचे, ना तिकडचे' अशी त्यांची दयनीय स्थिती होते. अशा परिस्थितीत अस्वस्थ असलेले समाजजीवन अधिकच अस्वस्थ बनते. अशा अस्वस्थ समाजजीवनाचा वेध घेत दक्षिण आशियातील माओवादी गटांच्या करवायांचा अभ्यास उपरोक्त ग्रंथात मांडण्यात आला आहे. पशुपती (नेपाळ) ते तिरु पती (आंध्रप्रदेश) या भौगोलिक प्रदेशातील हा अभ्यास संघर्षाच्या काळातील 'जगण्या'चा अनुभव शब्दबद्ध करतो. मानवजातिसंबंधीच्या दृष्टिकोणातून पुढे आलेल्या या ग्रंथात माओवादाचा समग्र मागोवा घेतानाच संघर्षग्रस्त भागातील नागरिक कसकशा प्रकारच्या संकटांना सामोरे जातात, आपल्या विवंचना, दुःख, भीती, संशय आणि क्वचित कुठेतरी अनुभवाला येणारा आनंद कसा वाटून घेतात, या बाबींना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. नेपाळ आणि भारतातील काही प्रांतांमधील माओवाद्यांच्या घडामोडी यांचा तुलनात्मक अभ्यासही या ग्रंथात मांडण्यात आला आहे. प्रांताप्रांतातील घडामोडींचे कंगोरे या ग्रंथाने टिपले आहेत. यांतील भिन्नता वा साधर्म्य यांचाही विचार या ग्रंथात करण्यात आला आहे. दोन्ही देशांमधील परिस्थिती लक्षात घेऊन विविध पातळ्यांवर कसकसा संघर्ष असतो ते सांगणारा हा ग्रंथ या विषयाच्या अभ्यासकांप्रमाणेच विचक्षण वाचकांसाठीही मोलाचा ठरावा. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया
●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन ●जया सागडे

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**